दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५ | अंक २३० • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**आजचा दिनविशेष**
१९९८ : संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (DRDO) च्या सात प्रयोगशाळा औद्योगिक क्षेत्रासाठी खुल्या करण्यात आल्या.

SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक
दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# राहुल गांधींच्या डोक्यातली चीप चोरीला, देवेंद्र फडणवीसांची बोचरी टीका!

## एका मतदाराचे नाव दोन ते तीन राज्यांत आहे, असे गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केले



लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन भारतीय निवडणूक आयोगाला थेट आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक तसेच इतर राज्यांच्या निवडणुकीत मोठा घोळ झाला आहे. मतदारांची संख्या वाढवण्यात आली. मतदान संपल्यानंतर अचानक मतदार वाढले, एका मतदाराचे नाव दोन ते तीन राज्यांत आहे, असे गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केले. तसेच हा आरोप करताना त्यांनी थेट पुरावेही दिले आहेत. राहुल गांधींच्या या पत्रकार परिषदेनंतर राज्यभरात खळबळ उडाली आहे. निवडणूक आयोगाच्या काम करण्याच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. आता राहुल गांधींच्या याच आरोपांवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राहुल गांधींची हार्डडिस्क करप्ट झाली आहे, असा टोला फडणवीसांनी लगावलाय. काहीतरी नवे सांगून ते लक्ष खेचण्याचा प्रयत्न तसेच राहुल गांधी हे रोज वेगवेगळे आकडे देत आहेत. महाराष्ट्रात 75 लाख मतदार वाढले, असा दावा त्यांनी केला होता. त्यानंतर आता ते महाराष्ट्रात 1 कोटी मतदार वाढले आहेत, असा दावा करतायत. दरवेळी काहीतरी नवे सांगून ते लक्ष खेचण्याचा प्रयत्न करतात. त्यांची जमीन संपलेली आहे, हे त्यांच्या लक्षात आलं आहे. बिहारमध्येही आम्हाला निवडून येता येणार नाही. महाराष्ट्रातील पुढच्याही निवडणुकीत आमचा विजय होणार नाही, हे त्यांना माहिती आहे.

### राहुल गांधींच्या डोक्यातील चीप चोरीला गेली

खरं सांगायचं तर मतांची चोरी ही महाराष्ट्रात तसेच भारतात कुठेही झालेली नाही. राहुल गांधी यांच्या डोक्यातील चीप चोरीला गेली आहे. त्यांची हार्डडिस्क करप्ट झाली आहे. म्हणून ते त्याच-त्याच गोष्टी रोज बोलत आहेत. ते खोटं बोलून पळून जात आहेत, अशी बोचरी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

# जनता विरोधी विशेष जन सुरक्षा कायदा ताबडतोब रद्द करा

माजलगाव प्रतिनिधी, शहरात विशेष जनसुरक्षा कायदा विरोधी कृती समितीच्या वतीने शहरातील चुन्नुमा रोड येथे दि ०६ ऑगस्ट गुरूवार रोजी सायंकाळी ७:०० वाजता सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी हा कायदा रद्द करण्याची मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस,आजाद क्रांती सेना,वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन सेना, शेतकरी कामगार पक्ष, मानवी हाक्क अभियान यांच्या वतीने करण्यात आली. हा कायदा लोकशाही विरोधी, संविधान विरोधी व जनतेच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारा असून भांडवलदारी धार्जिना आहे. यामुळे महाराष्ट्रातील सर्व फुले,शाहू, आंबेडकरवादी, मार्क्सवादी विचाराच्या चळवळी दाबल्या जाणार असून त्यांच्या विरोधातच या कायद्याचा हत्यार म्हणून वापर केला जाण्याची जास्त शक्यता आहे. त्याचबरोबर हा कायदा शेतकऱ्याच्या प्रश्नावर आंदोलन करणाऱ्यांना, मजुरांच्या प्रश्नावर आंदोलन करणाऱ्यांना, कामगारांच्या प्रश्नावर आवाज उठवणाऱ्यांना,दिन दलित दुबळे, आदिवासी व अल्पसंख्यांक समुदाय यांच्या बाजूने सरकारच्या विरोधात आवाज उठवला तर सरकार या कायद्याअंतर्गत ते बेकायदेशीर कृत्य समजेल.अशी कायद्यात तरतूद केलेली आहे. त्याचबरोबर अत्यंत




कडक शिक्षेची तरतूद असून लवकरात लवकर जामीन ही मिळणार नाही. आणि सरकारच्या विरोधी जो आवाज उठेल त्याला अर्बन नक्षलवादी ठरवून जेलमध्ये टाकण्याचे काम केले जाईल. म्हणून या कायद्याविरोधात मोठा लढा उभारून हा लढा संपूर्ण महाराष्ट्रात पसरविण्याचे आवाहन या सभेच्या माध्यमातून करण्यात आले. त्याचबरोबर राज्यपालांनी या कायद्यावर स्वाक्षरी करू नये असेही आवाहन करण्यात आले.आणि येणाऱ्या काळात या मुद्द्यावर जनतेमध्ये जनजागृती करून या कायद्याचे गांभीर्य जनतेने ओळखावे यासाठी कृती समिती लढा उभारणार आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी मुसद्दीक बाबा होते.



बीड तालुक्यातील यशवंत विद्यालय कुर्ला येथे वृक्षारोपणाचा महा कुंभ अंतर्गत लक्ष लागवड केली याप्रसंगी मुख्याध्यापक अभिषेक राऊत पर्यवेक्षक जामकर सर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते

# लोकनेते गोपीनाथ मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना विजयी करून परिवर्तन घडव नवनाथ अण्णा शिराळे पाटील

बीड प्रतिनिधी. वैद्यनाथ बँक निवडणूक 2025 लोकनेते गोपीनाथ मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना विजयी करून परिवर्तन घडवा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी सर्व मतदार बंधू आणि भगिनी यांना कळकळीचे आवाहन विनंतीपूर्वक केले आहे वैद्यनाथ बँक ही अतिशय उत्कृष्ट उल्लेखनीय बँक असून सर्व ठेवीदारांच्या ठेवी अतिशय चांगल्या प्रकारे ठेवून त्यांना चांगल्या प्रकारे ठेवीदारांना बँकेच्या माध्यमातून लाभ मिळत आणि वैद्यनाथ बँक अतिशय यशस्वी बँक असल्याचे ठेवीदारांमधून बोलले जात आहे ही बँक महाराष्ट्रातच नव्हे तर आता दिल्लीमध्ये देखील या बँकेची शाखा स्थापन करण्याचे मानस असल्याचे बीड जिल्ह्याच्या माजी खासदार श्रीमती डॉक्टर प्रीतम ताई मुंडे यांनी मागच्या दोन दिवसापूर्वी झालेल्या बैठकीमध्ये बोलून दाखवले आहे म्हणून ही बँक आता राष्ट्रीय नॅशनलाईज दर्जाची पतसंस्था बँक म्हणून देखील आता भविष्यामध्ये ओळखली जाणार असल्याचे आता सर्व ठेवीदारांमधून बोलले जाऊ लागले आहे म्हणून आता सर्व मतदार बंधू आणि भगिनी यांनी या वैजनाथ बँकेच्या निवडणुकीमध्ये लोकनेते गोपीनाथ मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व विजयी उमेदवारांना विजयी करून बीड जिल्ह्यामधून परिवर्तन घडवावे असे आव्हान भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे . आणि आज ती भारताला तंत्रज्ञानाच्या आघाडीवर घेऊन गेली आहे, असेही म्हटले आहे.

# प्रभारी अधिकारी राजेश गडवे यांचा वाळू माफियांना तिसरा दणका
# राक्षसभवन मध्ये वाळूने भरलेला ट्रॅक्टर पकडला ;चालक फरार

गेवराई प्रतिनिधी ÷राक्षसभवन गावात रात्रीच्या गस्त करत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात वाळूने भरलेला ट्रॅक्टर आढळून आल्याने त्यास प्रभारी पोलिस अधिकारी राजेश गडवे आणि गोपनीय शाखेचे येळे यांनी पाठलाग करत तो ट्रॅक्टर पकडून कार्यवाही केल्याने वाळू माफियांना गडवे यांनी तिसरा दणका दिला असून पोलिस हवालदार अमोल येळे यांच्या फिर्यादी वरुण ट्रॅक्टर वर गुन्हा दाखल करून चार लाख पंच्याऐंशी हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.



गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलिस ठाण्याचे प्रभारी म्हणून एपीआय राजेश गडवे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी पदभार घेतच दोन नंबर वाल्यांना दणका दिला आहे,एक पाठोपाठ धडक तीन कारवाया करत अवैध वाळू वाहतूक करणारे वाहने पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याने तालुक्यात या कारवाईचे कौतुक होत आहे.पदभार घेतच धडक कारवाईला सुरुवात करून राजेश गडवे यांनी आपल्या कार्याची तत्परता दाखवून दिली.दिनांक 6 रोजी उपविभागीय पेट्रोलिंग दरम्यान राक्षसभवन गावात अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर दिसताच पोलिसांनी त्याचा पाठलाग केला परंतु चालकाने अंधाराचा फायदा घेत गावातील गल्लीत ट्रॅक्टर पळवला आणि ट्रॅक्टर जागीच सोडून पळून गेला यावेळी एपीआय गडवे आणि पोलिस हवालदार येळे यांनी गावातील दोन पंच आणि उमापूर चौकीचे पोलिस हवालदार पवार यांना बोलावून स्पॉट पंचनामा करत ट्रॅक्टर जप्त केले.ही कार्यवाही केल्याने वाळू माफियांना चांगलाच दणका बसला असून एपीआय राजेश गडवे आणि पोलिस हवालदार येळे

# राष्ट्रवादी भवन ते लेंडी रोड रस्ता दुरुस्तीची मागणी तीव्र

बीड (प्रतिनिधी) – बीड शहरातील राष्ट्रवादी भवन ते लेंडी रोड हा महत्त्वाचा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून खराब अवस्थेत असून, या रस्त्याचा दैनंदिन वापर करणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. याच रस्त्यालगत योग्य नाली व्यवस्था नसल्यामुळे पावसाच्या दिवसात साचणारे पाणी व सांडपाण्यामुळे नागरिकांचे आरोग्यही धोक्यात येत आहे. सदर रस्त्याचे काँक्रिटीकरण व दोन्ही बाजूंनी नाली बांधकाम करून देण्याची विनंती एजाज कुरेशी, सय्यद अल्ताफ व साउथ इनामदार यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. अजितदादा पवार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती होणे गरजेचे असल्याचे स्थानिक नागरिकांनी स्पष्ट केले आहे. या मागणीस लवकरात लवकर सकारात्मक प्रतिसाद मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बीड जिल्ह्यातील पत्रकारांना घरासाठी जागा उपलब्ध करून द्या
# लोकशाही पत्रकार संघाचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन

बीड दि.७(प्रतिनिधी)-बीड जिल्ह्यातील शेकडो पत्रकारांनी कुटुंबाकडे दुर्लक्ष करून देशाचे व समाजसेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबीयांना राहण्यासाठी घर बांधता आले नाही. परंतु आजच्या काळात आपल्या कुटुंबीयांचे घराचे स्वप्न पूर्ण करता यावे या भावनेतून आणि लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सदैव तळमळ करणाऱ्या पत्रकारांची वेदना आणि व्यथा लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ज्ञबीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी पत्रकारांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. या मागणीचे निवेदन लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, मराठवाडा विभागाचे कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष साहस आदोडे यांनी दिले. बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेला मोठा




इतिहास आहे. जनसेवा हीच ईश्वरसेवा माणून या जिल्ह्यातील अनेक गुणी पत्रकार तुटपुंज्या मानधनावर काम करत होते शिवाय आहेत ही जिल्ह्यातील अनेक पत्रकारांनी पत्रकारितेमध्ये आपले संपूर्ण आयुष्य वेचले, आपल्या पत्रकारितेच्या काळात या पत्रकारांनी कुटुंबाचा किंवा आपल्या घरातील सदस्यांच्या सुखाचा विचार कधीच केला नाही. आज जिल्ह्यातील विविध दैनिकातील शेकडो पत्रकार वयोवृद्ध झाले आहेत. कित्येक पत्रकारांचे आयुष्य संपले तरीही त्यांना आपल्या कुटुंबीयांसाठी घर बांधता आले नाही. आजच्या काळात पत्रकारांना प्लॉट खरेदी करून घर बांधणे अशक्य बाब झाली आहे. पत्रकारिता करत असताना आपल्या कुटुंबीयांचे घराचे स्वप्न पूर्ण करता यावे यासाठी ही बाब लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी बीड जिल्ह्यातील पत्रकारांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी या मागणीचे निवेदन दिले. यावेळी अजित पवार यांनी सकारात्मकता दावून जागा उपलब्ध करण्याचे आश्वासन दिले आहे. या निवेदनावर संस्थापक अध्यक्ष लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश उपाध्यक्षा हलीमा शेख, मराठवाडा कार्याध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ बीड जिल्हाध्यक्ष श्री साहस आदोडे, जिल्हा संघटक श्री संजय कुलकर्णी यांच्या सह्या आहेत.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

# कमळा

घाटेगाव च्या आजू बाजूला लांबच लांब डोंगरांची साखळी आहे.या डोंगर साखळीत पूर्व बाजूला सगळ्यात उंच कान्होबाचा डोंगर आहे.या डोंगरातून एक नदी वाघी नावाची नदी उगम पावते. ही नदी गावाला वळसा घालते. गावा जवळून वहाते.गावा जवळून वहातानागावातील बाया बापड्या धुणे धुवायलाया नदीवर येतात.वरच्या बाजूला खडकावर बायकांची गर्दीच गर्दी असते. पलीकडे उंबराचे खूप मोठ्ठे जुने झाड आहे.खाली या नदीला उंबराच्या झाडा जवळ खोल डोह आहे.इकडे बहुधा कुणी जात नाही.या डोहाबद्दल वेगवेगळ्या दंतकथा सांगीतल्या जातात. गावातील लोक गुरे ढोरे या नदीवर धुण्यासाठी आणतात.पाणी पाजण्यासाठी आणतात. पोळ्याच्या आधी दोन दिवस खांदमळणी असते,या नदीच्या पाण्यात गुरं धुण्यासाठी लोकांची गर्दी होते नदीच्या वरच्या बाजूला लांब टेकड्या पर्यंत मोकळे पटांगण आहे. पावसाळ्यात तर हे पटांगण हिरवळीने पुर्ण पणे माखलेले असते.जणू जमीनीवर हिरवा शालू अंथरुन ठेवलेला आहे,आणि त्यावर विविध रंगी बेरंगी त्या गवत फुलांची नक्षी काढलेली आहे की काय असे वाटते. टेकडीच्या उतारावर एक मंदिर आहे.हे मंदिर जुनाट छोटेसे आहे. कधी आणि कोणी बांधले आहे, कोणास ठाऊक.बहुधा हे मारुतीचे मंदिर असावे.मंदिर दाट झाडा झुडूपांनी व्यापलेले आहे.भर उन्हाळ्यात दुपारच्या भरी जेंव्हा चिंग चिंग उन् पडते,उकाडा असह्य होतो,पाखरे झाडा झुडूपात गुडूप होऊन बसतात.ऊन्हाने जीवाची काढ घाल होते,तेव्हा हा मंदिराचा परिसर अत्यंत सुखद गारवा घेऊन बसलेला असतो. गुराखी गुरे चारायला घेऊन येतात.दिवस भर गुरे चारतात. दुपारच्या भरी मग या मारुतीच्या मंदिराच्या ओट्यावर बसून.दुपारची जेवणे एकत्रीत पणे करतात. मग डुळका घेतात.तर गुरे झाडाच्या सावलीत रवंथ करीत बसतात.नदी काठच्या हा परिसर झाडा हिरव्या गार झुडूपांनी व्यापलेला.तर हे पटांगण म्हणजे गायरान.त्या टेकड्यांच्या पायथ्या पर्यंत पसरलेलेआहे.तिथून पुढे गावचे शेत शिवार सुरु होते. ऊसाच्या मळ्याची दाटी,कुठे संत्री मोसंबीचे मळे,कुठे भाजी पाल्याची हिरवी गार वाकाने,तर कुठे घासाच्या वाकान्यांचे पट्टे मनावरील ताण तणावाचे ओझे अलगत शोषून घेतात.मनावरचा ताण आपो आपच निघून जातो.मन आपोआपच हलके होते. शेतात शेतातील विहीरीच्या धावे वरील दाट आंब्या पिंपळाची,जांभळाची,चिंचेची मोठमोठी झाडे धारेवर दाट सावली करुन हिंरीला संरक्षण देतात जणू.अनेक पाखरांच्या घरटयांना सामाऊन घेतात.जणू पाखरांची छोटंसं गावाचं येथे वसलेलं असतं असं वाटतं. त्या पलिकडे दक्षिण बाजूला जरा गावा जवळच्या उंच टेकडी वर देवीचे मंदिर.मंदिर बरेच प्रशस्त आहे.आणि त्याच्या भोवती टेकडीवर मोकळे पटांगण आहे.मंदिराभोवती दाट झाडी आहे.पटांगणात ठिक ठिकाणी बसायला झांडांभोवती चौथरे आहेत. ऊन्हाळा असला तरीही वर दोन जुनाट टाके आहेत.त्यात बाराही महिने थंडगार पाणी असते.आजू बाजूला कुठेही पाणी असो, नसो,ही दोन्ही टाके थंडगार पाण्याने सतत भरलेली असतात.ही निसर्गाची किमयाच म्हणावी लागेल.या डोंगरावर गावची जत्रा भरते.ऊन्हाळ्यात खळे तळे आवरले की यात्रा सुरु होतात.होळी झाली की सातव्या दिवसी गावची यात्रा सुरु होते. त्या वेळी गावात सात दिवस गावात उत्सवच असतो.तसेच हा यात्रा उत्सव संपताच गावात पंचमी उत्सव सुरु होतो.हा पंचमी उत्सव पुढील सात दिवस निख्खळ मनोरंजन चालते. खरं तर हा पंचमी उत्सव पाच दिवसांचा असतो. पण त्याच्या आधीचा एक दिवस पहिला कार्यक्रम सुरु होतो.या पहिल्या दिवसाला बोहडा म्हणतात.हा बोहडा देवपुजेने सुरु होतो. तर शेवटचा दिवस हा खुशालीचा म्हणून असतो.या सात दिवसा दरम्यान पंचमीत विविध देव देवतांची सोंगे निघतात.त्यातील काही मानाची सोंगे असतात.गायरान संपले की शेत शिवार सुरु होते.आणि या गायरानातून गावाच्या वेगवेगळ्या दिशेने शिवरा कडे जाणा-या बैल गागाड्यांच्या चाकाचे पट्टे निर्माण झालेले आहेत.

## श्री क्षेत्र चाकरवाडी म्हणजे परमार्थाचे उभे पीक बालाजी महाराज बोराडे यांचे प्रतिपादन..

# बीड जिल्हा संतांची भूमी म्हणुन ओळखली जाते



बीड प्रतिनिधी - श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये भजन केलं तर पुण्य भेटते. जुने माणसे खूप भाग्यवान असतात. परमार्थाचे उभे पिक हे चाकरवाडी मध्ये आहे. महाराष्ट्रातील नव्हे तर जगातील एकमेव ठिकाण २४ तास अन्नदान सेवा सुरू आहे ते म्हणजे श्री क्षेत्र चाकरवाडी आहे. प्रति वर्षाप्रमाणे विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या आशीर्वादाने आणि ह. भ. प महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह व बाळनाथ महाराज यांचा पालखी सोहळ्यातील तिसऱ्या दिवसाची कीर्तन सेवा ह. भ. प बालाजी महाराज बोराडे यांची संपन्न झाली. जगामध्ये सर्वोत्तम सेवा कोणती असेल तर ती संत सेवा आहे त्या साठी संतांची सेवा करा तुम्हाला कोणत्याच गोष्टीची कमी पडणार नाही. दादा माऊली यांच्या आशीर्वादाने कोणत्याच गोष्टीची कमतरता पडणार नाही. दादा माऊली यांची तुम्ही सेवा करा असा भाविकांना महाराजांनी संदेश दिला. देवाला जर कोणती सेवा आवडत असेल तर ती संत सेवा आहे. जगाच्या पाठीवर उत्तम सेवा कोणती असेल तर ती संत सेवाच आहे. चांगले माणूस बघायचे असेल तर श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये आहे. चांगलं माणूस बनायचं असेल तर ते संप्रदाय आहे. आणि जर परमआनंद कोठे असेल तर तो पण या वारकरी संप्रदायामध्ये आहे. जे माणसे देव, द्वेष, समाजासाठी, देशासाठी जगतात ते अजरामर असतात. पण जे स्वतःच्या स्वार्थासाठी जगतात ते अजरामर राहत नाहीत. चाकरवाडी मध्ये भजन केलं तर पुण्य भेटते.जगात भारतासारखी संस्कृती नाही जगामध्ये संस्कृती च्या बाबती मध्ये ओळखला जाणारा देश म्हणजे भारत देश आहे. सूर्य उगवल्या बरोबर पहिल किरण टाकणारा देश हा भारत देश आहे. महाराष्ट्राला संतभूमी म्हणून ओळखले जाते. परमार्थ मध्ये जात, धर्म, पंत नाही या परमार्थांमध्ये सगळ्यांना सारखे मानले जाते ते एकमेव ठिकाण आहे म्हणजे परमार्थ आहे. महाराजांनी सांगितले की माझे पूर्वी जन्मीचे पुण्य आहे म्हणून मला या ठिकाणी सेवा करण्याचे पुण्य लाभले आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे सगळे तीर्थ जर एक ठिकाणी पाहायचे असेल तर ते श्री गुरु यांच्या चरणी पहावे. सगळीकडे भगवान परमात्मा आहे असे एकही ठिकाण सापडणार नाही त्या ठिकाणी भगवान परमात्मा नाही. जर पूजा कोणाची करायची असेल तर श्री गुरु यांची पूजा करा. जगामध्ये उत्तम लाभ होण्याचे ठिकाण म्हणजे संत होय. संताना बघितले तरही लाभ होतो, नमचिंतन, चरण जवळ बसून राहिले तरही लाभ होतो. यावेळी गायनाचार्य दत्ता महाराज चव्हाण, रेवण महाराज महादेव महाराज रोडे, पिंपळे महाराज , माखले महाराज, हनुमंत महाराज घोलप मृदंगाचार्य अमोल महाराज पवार, आविष्कार महाराज क्षीरसागर तसेच त्रिंबक महाराज शेळके, अनिकेत महाराज अनवाने, प्रशांत महाराज क्षीरसागर, श्री क्षेत्र चाकरवाडी चे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, आदर्श शिक्षक परमेश्वर भोसले सर, पत्रकार अभिजीत पवार, ज्ञानोबा अनवणे, मंचिक पवार, ग्रामसेवक सुरवसे साहेब, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते

# १५ ऑगस्ट डिजिटल इंडिया फाऊंडेशन डे जाहिर करा

# खा.बजरंग सोनवणे यांची पंतप्रधान मोंदींकडे मागणी

बीड : भारताच्या इंटरनेट युगाला ३० वर्षे पूर्ण झाले असून १५ ऑगस्ट हा 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' जाहीर करण्याची मागणी खा.बजरंग सोनवणे यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी व संचारमंत्री ज्योतिरादित्य राजे शिंदे यांच्याकडे केली आहे. बीडचे खा.सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, भारतामध्ये सार्वजनिक इंटरनेट सेवा सुरू होऊन यंदा ३० वर्षे पूर्ण होत आहेत. १५ ऑगस्ट १९९५ रोजी विदेश संचार निगम लिमिटेड मार्फत सार्वजनिक इंटरनेटचा शुभारंभ झाला होता. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व संचार मंत्री



यांना पत्र लिहून १५ ऑगस्ट २०२५ हा दिवस 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' म्हणून साजरा करण्याची मागणी केली आहे. सन १९८६ साली सुरु झालेली भारताची डिजिटल क्रांती ही केवळ व्यापारापुरती मर्यादित नव्हती, तर ती शिक्षण,संशोधन व आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले एक दूरदृष्टीपूर्ण पाऊल होते. त्यांनी आपल्या पत्रात भारताच्या इंटरनेट प्रवासातील काही महत्त्वाचे टप्पे अधोरेखित केले आहेत: १९८६ शिक्षण व संशोधन संस्थांसाठी इंटरनेट सेवा, १९८७ जिल्हास्तरावर शासन व नियोजन संस्थांना कनेक्टव्हिटि, १९९५ सार्वजनिक इंटरनेट सेवा सुरू, १९९८ खासगी इंटरनेट कंपन्यांसाठी दरवाजे खुले, २००५ ई-कॉमर्स, टेलिमेडिसिन, ऑनलाईन शिक्षणासाठी गती, २०१६ स्वस्त मोबाइल डेटा, युपीआय आधार या प्रणालींची निर्मिती, २०२५ तंत्रज्ञानात जागतिक नेतृत्वाची दिशा देण्याचे काम झाले आहे. आज भारताचा तरुण आयटी निर्यात, स्टार्टअप्स आणि डिजिटलीकरणाच्या बाबतीत तो जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करत आहे. डिजिटल वाटचाल बाजारपेठेच्या उद्देशाने नव्हे तर सार्वजनिक हित लक्षात घेऊन सुरू झाली होती, आणि आज ती भारताला तंत्रज्ञानाच्या आघाडीवर घेऊन गेली आहे, असेही म्हटले आहे.खा.सोनवणेंच्या महत्वाच्या मागण्या1. १५ ऑगस्ट २०२५ ला 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' म्हणून मान्यता द्यावी. 2. इंटरनेट, एनआयसी या संस्थांचे योगदान औपचारिकपणे गौरवावे. 3. 'राष्ट्रीय डिजिटल संग्रहालय' स्थापन करून भारताच्या इंटरनेट प्रवासाचे दस्तऐवजीकरण करावे.

## वारकरी संप्रदायाचे मूळ नाथपरंपरेतून आहे - विशाल महाराज खोले

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे भाविक भक्तांची प्रचंड गर्दी

बीड /प्रतिनिधी : जगाच्या पाठीवर वारकरी हा एकमेव संप्रदाय आहे जो 700 ते 800 वर्षापासून सुरू आहे. अनेक आक्रमण झाली परंतु वारकरी संप्रदाय तक धरून आहे या वारकरी संप्रदायाचे मूळ नातं परंपरेतून आहे असे गौरव उद्गार विशाल महाराज खोले यांनी केले. विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या मध्ये



बुधवारी कीर्तन सेवा ह.भ.प. विशाल महाराज खोले मुक्ताई नगर यांनी समर्पित केली. यावेळी खोले महाराज बोलत होते.

जगाच्या पाठीवर वारकरी हा एकमेव संप्रदाय आहे जो 700 ते 800 वर्षा पासून सुरू आहे अनेक आक्रमण झाली परंतु वारकरी संप्रदाय तग धरून आहे. आणि चंद्र सूर्य असे पर्यंत अजरामर झाला आहे. या वारकरी संप्रदयाचं मूळ हा नाथ परंपरा आहे. गहिनीनाथ महाराजांनी संत निवृत्तीनाथ महाराज यांना दिक्षा दिली. निवृत्तीनाथ महाराज यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांना दिली आज संत ज्ञानेश्वर महाराज यांनी जगाला संदेश दिला. आज वारकरी संप्रदाय दिसत आहे तो नाथ परंपरेतून आला आहे.

आज गोरक्षनाथ टेकडीवर जन समुदाय दिसत आहे. तो फक्त गुरू किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा यांच्या त्याग व तपाच फलित आहे. नाथांनी आपल आयुष्य जगाच्या कल्याणासाठी समर्पित केले. आदिनाथ, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ, चरपटीनाथ यांनी आपलं आयुष्य जगाच्या कल्याणासाठी समर्पित केलं. नाथ परंपरा ही जगाचं कल्याण करण्यासाठी अहोरात्र काम करत आहे. असे विवेचन खोले महाराज यांनी केले. त्यांना मृदुंगसाथ महाराज यांनी दिली. आज संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथावर प्रवचन झाले. बुधवारी खोले महाराज यांच्या कीर्तन सेवेलाला भाविक भक्तांची प्रचंड गर्दी होती.

## ऊसतोड कामगाराच्या कल्याणासाठी शासन कटिबद्ध - पालकमंत्री अजित पवार

# मेळाव्यास ऊसतोड कामगारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड, दिनांक ७: बीड जिल्ह्याची ओळख ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून आहे. परंतु ऊसतोड कामगारांसाठी विविध कल्याणकारी अशा योजना आहेत. ऊसतोड कामगारांचे जीवन सुखकर होऊन त्यांच्या जीवनात स्थिरता, सुरक्षितता निर्माण करण्यासाठी गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापन करण्यात आलेली आहे. या महामंडळाच्या माध्यमातूनही विविध योजना राबविण्यात येतात. त्याचा लाभ सर्व कामगारांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली. जिल्हा परिषद व सामाजिक न्याय विभागाच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे जिल्ह्यातील ऊसतोड कामगार आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन व मिशन साथी उपक्रमाचा शुभारंभ श्री. पवार यांच्या हस्ते झाला.

यावेळी सर्वश्री आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, धनंजय मुंडे, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, नमिता मुंदडा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आदींसह जिल्हा परिषदेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. पवार म्हणाले, कष्टकरी ऊसतोड कामगार स्वाभिमानी आहे. त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम शासन करत आहे. बीडमध्ये ऊसतोड कामगाराचे अनेक प्रश्न, समस्या आहेत. त्या दूर करण्यासाठी शासन सदैव त्यांच्या पाठिशी आहे. त्यांच्या प्रत्येक पाल्याला उत्तम शिक्षण मिळावा यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची गरज आहे. ऊसतोड कामगारांसाठी अनेक योजना आहेत. त्यांचा लाभ सर्वांनी घ्यावा, यामध्ये सदस्यांना ओळखपत्र देण्यात येते. केवळ २० रूपयांमध्ये अर्ज करता येतो. संत भगवान बाबा वसतिगृह योजनेंतर्गत २२ वसतिगृह राज्यात मंजूर करण्यात आली आहेत, त्यापैकी १६ वसतिगृह सुरू आहेत. या वसतिगृहांना आर्थिक




मदत देण्यासही शासन सकारात्मक आहे. ऊसतोड कामगारांची पुढची पिढी ऊसतोड कामगार राहणार नाही, याची काळजी घेऊन त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यात येईल, असेही श्री. पवार म्हणाले. आजच्या नवतंत्रज्ञानाच्या काळात साधनेही आधुनिक स्वरूपात बाजारात उपलब्ध झालेली आहेत. यांत्रिकीकरण वाढत आहे, त्यामुळे सर्वांना काळानुरूप बदलावे लागेल, असेही ते म्हणाले. शासनाने सीट्रीपलआयटीच्या माध्यमातून याठिकाणी कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे, यासाठी मदत होणार आहे. या केंद्रातून आगामी काही वर्षात दरवर्षी ७००० कुशल विद्यार्थी निर्माण होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील कौशल्यवर्धक तंत्रशिक्षण व व्यावसायाभिमूख रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टी सीट्रीपलआयटी प्रकल्प बीड जिल्ह्यात निर्माण करण्यात येत आहे. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वांनी पुढकार घ्यावा शासन निधी देईल, तो सत्कारणी लावावा, असेही ते म्हणाले. बीड-अहिल्यानगर-मुंबई रेल्वे लवकरच सुरू करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. यासह बीड शहराजवळ किफायतशीर स्वरूपात विमानतळ असावे, यासाठीही प्रयत्न करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात आरोग्य साथी महिलांना फर्स्ट एड किटचे (प्रथमोपचार पेटी) वाटप करण्यात आले. ऊसतोड कामगारांसाठी उपयुक्त माहिती पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने 'बाल विवाह प्रतिबंधक' प्रतिज्ञेने समाजातील सकारात्मक बदल घडवण्याचा निर्धारही सर्वांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. या कार्यक्रमात ग्रामीण गृहनिर्माण (घरकुल) चॅटबॉट सुविधेचा प्रारंभ करण्यात आला. मेळाव्यास उपस्थित सर्व महिलांना श्री.पवार यांनी रक्षाबंधनाच्या शुभेच्छाही दिल्या.

00000

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# गेवराई तालुक्यातील म्हाळसपिंपळगावात वाळूमाफियांचा हैदोस; तहसीलदारांचे दुर्लक्ष..!



गेवराई प्रतिनिधी: गेवराई तालुक्यातील म्हाळसपिंपळगाव येथे गोदावरी नदीच्या पात्रात वाळूमाफियांनी थैमान घातले आहे. बेफामपणे यांत्रिक उत्खनन करून दररोज मोठ्या प्रमाणात वाळूची चोरटी वाहतूक केली जात आहे. एल.पी. ट्रक आणि जेसीबीच्या साहाय्याने रात्री-अपरात्री ही लूट सुरू आहे, मात्र स्थानिक तहसीलदार आणि प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे.गेल्या आठवड्यात अवैध वाळूचे साठे जप्त करुन देखील गुन्हे दाखल केले नाही .त्या मुळे बेकायदा वाळु उपसा मुळे गोदावरी नदीच्या पात्राला धोका निर्माण झाला असून, पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. म्हाळसपिंपळगाव परिसरात वाळूमाफियांनी स्थानिक प्रशासनाला हाताशी धरल्याची चर्चा आहे. रात्रीच्या अंधारात एलपी ट्रक आणि टिप्परद्वारे वाळूची तस्करी बिनधास्तपणे सुरू आहे. स्थानिक ग्रामस्थांनी याबाबत वारंवार तक्रारी केल्या, परंतु तहसीलदार आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. यामुळे माफियांचे फावले आहे. नदीपात्रातील बेकायदा उत्खननामुळे शेती आणि पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होत आहे. स्थानिकांनी आरोप केला की, काही प्रभावशाली व्यक्तींच्या आशीर्वादाने हा काळाबाजार फोफावला आहे. महाराष्ट्र शासनाने वाळू उत्खननावर कठोर नियम लागू केले असताना, गेवराईत मात्र त्याची पायमल्ली होत आहे. प्रशासनाच्या या निष्क्रियतेमुळे ग्रामस्थांमध्ये संताप आहे. जर तातडीने कारवाई झाली नाही, तर आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. तहसीलदारांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन वाळूमाफियांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## म्हाळसपिंपळगावात वाळू माफियांवर मेहरबानी?
### 12 वाळू साठे जप्त, पण कारवाईला खीळ! प्रशासनात दबदबा असलेला वाळु माफियाने केली मध्यस्थती?

गेवराई प्रतिनिधी: - गेवराई तालुक्यातील म्हाळसपिंपळगाव येथे गोदावरी नदीतून अवैध वाळू उपसा करून साठवलेले 12 वाळू साठे महसूल विभागाने गेल्या आठवड्यात जप्त केले. मात्र, या प्रकरणी वाळू माफियांवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संशयाचे धुके पसरले आहे. स्थानिक माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी थेट महसूलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते, प्रत्येकी 50 हजार रुपये लाच घेऊन वाळू माफियांच्या मध्यस्थामार्फत कारवाई टाळण्यात आली आहे. या भ्रष्टाचाराच्या आरोपांनी परिसरात खळबळ उडाली आहे. म्हाळसपिंपळगावात गोदावरीच्या पात्रातून ट्रॅक्टरद्वारे वाळू उपसा करून ती वेगवेगळ्या ठिकाणी साठवली जाते आणि नंतर एलपी ट्रकमधून अवैधरित्या वाहतूक केली जाते. महसूल विभागाने छापा टाकून 12 वाळू साठे जप्त केले होते, ज्यामुळे वाळू माफियांवर गुन्हे दाखल होण्याची अपेक्षा होती. परंतु, सय्यद एजाज यांच्या मते, लाचखोरीमुळे ही कारवाई दाबली गेली. ते लवकरच विभागीय आयुक्तांकडे याबाबत तक्रार दाखल करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणी गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी तहसील कार्यालयात संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु ते अनुपस्थित होते. त्यामुळे त्यांचे म्हणणे समजू शकले नाही. या घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. वाळू माफियांच्या बेकायदा कारवायांमुळे नदीपात्राचे मोठे नुकसान होत असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे माफियांचे मनोधैर्य वाढत आहे. आता विभागीय आयुक्त या तक्रारीची किती गंभीरपणे दखल घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून विविध विकास कामांचा आढावा

बीड, दिनांक 8 : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज जिल्ह्यातील मुख्य इमारतींचे इलेव्हेशन प्लॅन, श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर विकास आराखडा, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय रुग्णालय आराखडा, ग्रंथालय इमारत, सहकार संकुल आदी विविध विकास कामांचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात झालेल्या या बैठकीस सर्वश्री आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, धनंजय मुंडे, नमिता मुदंडा, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थिती होते. बीड जिल्ह्याकरीता महसुल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच प्रशासकीय इमारती उभारण्यात येत आहे. या सर्व इमारती एकाच परिसरात एकसमान उभारण्यात याव्यात. तसेच जिल्ह्याकरीता उभारण्यात येणारे जिल्हा ग्रंथालय, सहकार भवन या इमारती सुसज्ज आणि सर्व सुविधा असलेल्या



उभारण्यात याव्यात. संबंधीत विभागानी या इमारतीमध्ये अधिकारी-कर्मचारी आणि नागरिकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करावा. या सर्व प्रशासकीय इमारती उभारण्याचे काम अतिशय गतीने आणि दर्जेदार होतील याकडे लक्ष द्यावे. तसेच प्रत्येक इमारतीमध्ये सुर्यप्रकाश, व्हेंटीलेशन आणि सोलर सिस्टीमचा समावेश करावा. तसेच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामिण वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, सुमारे 50 वर्ष जूने असुन, ज्या इमारती कालबाह्य झाल्या आहेत, त्या इमारती धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयाच्या धर्तीवर उभारण्यासाठीचा विकास आराखडा तयार करावा. तसेच या रुग्णालयात रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय उपचारांच्या सुविधा येथे उपलब्ध करण्यासाठी प्रस्ताव तयार करुन पाठवावा. तसेच याठिकाणी काम करणारे अधिकारी-कर्मचारी यांची निवासस्थाने सुसज्ज व सर्व सुविधा असतील याची काळजी घ्यावी. रुग्णालयाच्या विकासासाठी नियमानुसार जे काही लागणार आहे, त्याचा प्लॅन तयार करुन सादर करावा.त्यास मान्यता आणि निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडून परळी वैजनाथ येथे रु.286.68 कोटींचा तिर्थक्षेत्र विकास आराखड्यास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. या प्रकल्पात काही बदल सुचवून रु.351.00 कोटी रक्कमेच्या सुधारित आराखड्यास जिल्हास्तरीय समितीमध्ये मान्यता देण्यात आली. आता हा आराखडा अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्यास लवकरच मान्यता प्राप्त करुन घेण्यात येईल. परंतू श्री क्षेत्र परळी वैजनाथ मंदिरास त्याचे पूरातन मुळ स्वरुप प्राप्त करण्यासाठीचा तसेच मंदिर परिसराचा विकास आराखडा तयार करावा. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी उभारण्यात येणाऱ्या सर्व इमारतीची संबंधीत अधिकारी आणि वास्तूरचनाकार यांच्याकडून सविस्तर आढावा घेवून आवश्यक त्या सूचना दिल्या. बीड - अहिल्यानगर रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून त्याची चाचणी देखील यशस्वी झाली आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनापासून बीड-मुंबई रेल्वे सुरु व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले. तसेच अंबेजागाई येथील लमान तांडा येथे नवीन कारागृहासाठी लागणाऱ्या जागेसाठी पाठपूरावा करुन यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच कंकालेश्वर देवस्थानाची असलेली 12 एकर जागेस संरक्षण भिंत उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करुन सादर करावा असे निर्देश दिले. महसूल भवनाचे भूमिपूजन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील महसुल भवनाचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज भूमिपूजन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगतीपथावर असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाची देखील पाहणी करत संबंधीतांकडून महसूल भवन आणि जिल्हाधिकारी कार्यालयाची माहिती घेवून संबंधीतांना आवश्यक त्या सूचना केल्या. तसेच इमारतीचे काम दर्जेदार करण्याच्या सूचनाही संबंधीतांना त्यांनी दिल्या. यावेळी सर्वश्री विक्रम काळे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थिती होते.

****

## उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून शहरातील विविध विकास कामांची पाहणी
# बीड शहराच्या वैभवात भर घालणारे कामे करावी– अजित पवार

बीड, दि.07 : बीड शहरात सुरू असलेली विविध विकास कामे करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार काम करावी. बीडकरांच्या स्मरणात राहील तसेच शहराच्या वैभवात भर घालणारे काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले. उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी आज सकाळी बीड शहरातील चंपावती क्रीडा मंडळ, कंकालेश्वर मंदिर, जिल्हा रुग्णालय, येथे सुरू असलेल्या व नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या विकास कामांची पाहणी केली. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार विजयसिंह पंडीत, माजी आमदार अमरसिंह पंडीत, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी




जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थित होते. कंकालेश्वर मंदिर येथे पाहणी करताना उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची माहिती घेतली. कंकालेश्वर देवस्थान हे बीड शहरासह जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. कंकालेश्वर देवस्थान परिसरात नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या विकास कामांमध्ये पारंपरिक व आधुनिकतेचा संगम साधत बीडकरांना कायम स्मरणात राहील असे दर्जेदार कामे करावी. विकास काम करताना ती कामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार व टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे. भाविकांना सर्व सोयीसुविधा मिळतील अशा सर्व बाबींचा आराखड्यामध्ये समावेश करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी दिल्या. श्री. पवार यांनी यावेळी कंकालेश्वर मंदिरात दर्शन घेतले. जिल्हा क्रीडा संकुलाची पाहणी करून उपस्थित नागरिकांशी उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी संवाद साधला. जिल्हा क्रीडा संकुलासाठी 2499.96 लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकात विशेष बाब म्हणून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला आहे. क्रीडा संकुलाच्या कामामुळे बीडकर नागरिकांना सुसज्ज क्रीडा संकुल उपलब्ध होणार आहे. यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, क्रीडा संकुलालगत असलेला संपूर्ण परिसर स्वच्छ करावा, या परिसरात कुठेही कचरा दिसणार नाही याबाबत नगरपालिका प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्हा रुग्णालय येथे सुरू असलेल्या कामाचीही उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी पाहणी केली. इमारतीची कामे करताना आगामी 50 वर्षांचा सर्वांगीण विचार केला पाहिजे, वीज, वाहनतळ, अग्निशामन यंत्रणा, सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्याधुनिक यंत्रणेचा वापर केला पाहिजे, इमारत पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना समाधान वाटले पाहिजे असे काम करा, असेही ते म्हणाले.

यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# केंद्राच्या योजनेतून बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारतीसाठी निधी मंजूर
## खा.बजरंग सोनवणे यांचे प्रयत्न फळाला, केजला दिले झुकते माप

बीड: पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत सन २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारती मंजुर करण्यात आलेल्या असून नवीन ग्रामपंचायत इमारत व नागरी सुविधा केंद्र खोली बांधण्यात येणार आहे. यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला असून आता या पाठपुराव्यामुळे गावांचा चेहरामोहरा बदलणार आहे. केंद्र शासनाने पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान या योजनेचे पुनर्गठन करुन राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना सन २०१८-१९ ते सन २०२१-२२ या कालावधीत राबविली आहे. सदर योजनेचा मुळ ढाचा न बदलता सन २०२२-२३ पासून पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना ग्रामविकास विभागाच्या निर्णयान्वये लागू केली आहे. सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेच्या निधीचे प्रमाण हे केंद्र हिस्सा ६०टक्के व राज्य हिस्सा ४०टक्के असे आहे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान योजनेसाठी वार्षिक कृती आराखड्यास केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे.ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज सुलभ होण्यासाठी संसदीय समितीच्या सूचनांनुसार ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा घटकांतर्गत नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत आणि त्यासोबत नागरी सुविधा केंद्र खोली मंजूर करण्यासाठी पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायतींकरीता नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकाम व नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामास मंजूर करण्यात आले आहे. यात केज तालुक्याला झुकते माप दिले असून २८ पैकी ४ इमारती या केज तालुक्यातील आहेत.



केंद्राकडे पाठविले प्रस्ताव उद्दिष्टाच्या अधीन राहून ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या ३००० पेक्षा अधिक आहे आणि त्यांना स्वमालकीची ग्रामपंचायत इमारत नाही, अथवा धोकादायक व मोडकळीस आलेली आहे, अशा ग्रामपंचायतींचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना केंद्र शासनाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात दिल्या होत्या. या ग्रामपंचायतींचा समावेश धोंडराई, नित्रूड, आडस, टाकरवण, जातेगाव, होळ, जिरेवाडी, बनसारोळा, बंगाली पिंपळगाव, मानूर, मोरेवाडी, तेलगाव, कोळगाव, जाटनांदूर, जवळगाव, सायगाव, सौताडा, मोगरा, आष्टा ह.ना., पाली, यूसफवडगाव, चेनई, केसापुरी, दादेगाव, पुस, गढी,पिंपळनेर, तिंतरवणी.

# श्री क्षेत्र चाकरवाडी म्हणजे परमार्थाचे उभे पीक बालाजी महाराज बोराडे यांचे प्रतिपादन

बीड प्रतिनिधी - श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये भजन केलं तर पुण्य भेटते. जुने माणसे खूप भाग्यवान असतात. परमार्थाचे उभे पिक हे चाकरवाडी मध्ये आहे. महाराष्ट्रातील नव्हे तर जगातील एकमेव ठिकाण २४ तास अन्नदान सेवा सुरू आहे ते म्हणजे श्री क्षेत्र चाकरवाडी आहे. प्रति वर्षाप्रमाणे विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या आशीर्वादाने आणि ह. भ. प महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह व बाळनाथ महाराज यांचा पालखी सोहळ्यातील तिसऱ्या दिवसाची कीर्तन सेवा ह. भ. प बालाजी महाराज बोराडे यांची संपन्न झाली. जगामध्ये सर्वोत्तम सेवा कोणती असेल तर ती संत सेवा आहे त्या साठी संतांची सेवा करा तुम्हाला कोणत्याच गोष्टीची कमी पडणार नाही. दादा माऊली यांच्या आशीर्वादाने कोणत्याच गोष्टीची कमतरता पडणार नाही. दादा माऊली यांची तुम्ही सेवा करा असा भाविकांना महाराजांनी संदेश दिला. देवाला जर कोणती सेवा आवडत असेल तर ती संत सेवा आहे. जगाच्या पाठीवर उत्तम सेवा कोणती असेल तर ती संत सेवाच आहे. चांगले माणूस बघायचे असेल तर श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये आहे. चांगलं माणूस बनायचं असेल तर ते संप्रदाय आहे. आणि जर परमआनंद कोठे असेल तर तो पण या वारकरी संप्रदायामध्ये आहे. जे




माणसे देव, द्वेष, समाजासाठी, देशासाठी जगतात ते अजरामर असतात. पण जे स्वतःच्या स्वार्थासाठी जगतात ते अजरामर राहत नाहीत. चाकरवाडी मध्ये भजन केलं तर पुण्य भेटते.जगात भारतासारखी संस्कृती नाही जगामध्ये संस्कृती च्या बाबती मध्ये ओळखला जाणारा देश म्हणजे भारत देश आहे. सूर्य उगवल्या बरोबर पहिल किरण टाकणारा देश हा भारत देश आहे. महाराष्ट्राला संतभूमी म्हणून ओळखले जाते. परमार्थ मध्ये जात, धर्म, पंत नाही या परमार्थांमध्ये सगळ्यांना सारखे मानले जाते ते एकमेव ठिकाण आहे म्हणजे परमार्थ आहे. महाराजांनी सांगितले की माझे पूर्वी जन्मीचे पुण्य आहे म्हणून मला या ठिकाणी सेवा करण्याचे पुण्य लाभले आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे सगळे तीर्थ जर एक ठिकाणी पाहायचे असेल तर ते श्री गुरु यांच्या चरणी पहावे. सगळीकडे भगवान परमात्मा आहे असे एकही ठिकाण सापडणार नाही त्या ठिकाणी भगवान परमात्मा नाही. जर पूजा कोणाची करायची असेल तर श्री गुरु यांची पूजा करा. जगामध्ये उत्तम लाभ होण्याचे ठिकाण म्हणजे संत होय. संताना बघितले तरही लाभ होतो, नमचिंतन, चरण जवळ बसून राहिले तरही लाभ होतो. यावेळी गायनाचार्य दत्ता महाराज चव्हाण, रेवण महाराज महादेव महाराज रोडे, पिंपळे महाराज , माखले महाराज, हनुमंत महाराज घोलप मृदंगाचार्य अमोल महाराज पवार, आविष्कार महाराज क्षीरसागर तसेच त्रिंबक महाराज शेळके, अनिकेत महाराज अनवाने, प्रशांत महाराज क्षीरसागर, श्री क्षेत्र चाकरवाडी चे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, आदर्श शिक्षक परमेश्वर भोसले सर, पत्रकार अभिजीत पवार, ज्ञानोबा अनवणे, मंचिक पवार, ग्रामसेवक सुरवसे साहेब, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते

# शिक्षक भरती घोटाळा प्रकरणी पुणे विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षेतखाली एस आय टी गठीत! अब तेरा क्या होगा नाना!

बीड – राज्यभर गाजत असलेल्या बोगस शालार्थ आयडी आणि शिक्षक भरती प्रकरणात राज्य सरकारने पुण्याचे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्पेशल यासाठी गठीत केली असून या निर्णयामुळे संस्थाचालक बोगस शिक्षक आणि शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी, उपसंचालक यांचे धाबे दणाणले आहेत. कितीही तक्रारी झाल्या आणि बातम्या आल्या तरीही आम्ही सगळं मॅनेज करू शकतो अशा थाटात वावरणाऱ्या नानासाठी हा मोठा धक्का समजण्यात येत आहे. एसआयटीच्या चौकशीमध्ये पे युनिट चे अधिकारी देखील अडकणार हे आता कन्फर्म झाले आहे  नागपूर जिल्ह्यात काही महिन्यांपूर्वी बोगस शालार्थ आयडी च्या माध्यमातून 1000 पेक्षा जास्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाल्याचे प्रकरण उघड झाले त्यानंतर अशा पद्धतीने बोगस शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची भरती ही मराठवाडा विदर्भ पश्चिम महाराष्ट्र खानदेश मुंबई या ठिकाणी देखील झाल्याच्या तक्रारी राज्य सरकारकडे प्राप्त झाल्या. राज्याचे विरोधी पक्षनेते विजय बडे तिवार यांच्यासहित अनेक आमदारांनी या भरती बाबत तक्रारी केल्यानंतर राज्य सरकारने स्पेशल एस आय टी ची घोषणा केली होती. नागपूर जळगाव अमरावती गडचिरोली यापेक्षाही मोठा घोटाळा बीड जिल्ह्यात झाला असल्याचा पडदा फास्ट न्यूज अँड व्यूजने केला होता.न्यूज अँड व्यूजने गेल्या सात-आठ महिन्यापासून हे प्रकरण लावून धरले होते या प्रकरणात बीडचे तत्कालीन शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे आणि भगवान फुलारी या दोघांची चौकशी देखील सुरू झालेली आहे. दरम्यान कोणी कितीही बातम्या केल्या आणि कितीही तक्रारी केल्या तरी देखील आमचं काहीच वाकड होत नाही अशा थाटात काही संस्थाचालक आणि त्यांच्यासाठी मॅनेजमेंट लावणाऱ्या नानाला स्वतःच्या कॉन्टॅक्ट वर प्रचंड विश्वास होता या नानाने प्रकरण मॅनेज करण्यासाठी मुंबई पर्यंत धडक मारली होती.मात्र आता एस आय टी स्थापन झाल्याने लाखो रुपये घेऊन बोगस नोकरी लावलेल्या या नाना ची झोप उडणार हे नक्की आहे. राज्य सरकारने अधिवेशनात जाहीर केल्याप्रमाणे राज्यस्तरीय एसआयटी ची स्थापना केली असून पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षेतखाली ही समिती गठीत केली आहे. या समिती मध्ये पोलीस महानिरीक्षक मनोज शर्मा,सहसंचालक हारून आतार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समिती काय तपासणी करणारं! राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालया अंतर्गत अनुदानित आणि अंशतः अनुदानित प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता शालार्थ मान्यता सेवा सातत्य विनाअनुदानित वरून अनुदानित पदावर केलेली बदली यांची तपासणी करणे व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणे. शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या देण्यात येणाऱ्या विविध मान्यतांच्या संदर्भात उदाहरणार्थ वैयक्तिक मान्यता शालार्थ मान्यता इत्यादीच्या अनुषंगाने प्रचलित व्यवस्थेमध्ये असलेल्या कमतरता शोधून त्या अनुषंगाने करावयाच्या बदलाबाबत सुधारणा सुचविणे. विशेष चौकशी पथकाने उपरोक्त कार्य कक्षेमधील नमूद प्रकरणी सन 2012 प्रकरणांचा तपास चौकशी करावी विशेष चौकशी पथकाने आपला अहवाल पथक गठीत झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत सादर करावा. सदर चौकशी कालावधीमध्ये विशेष चौकशी पथकाकडून केलेल्या मागणीनुसार मनुष्यबळ व तांत्रिक सहाय्य आयुक्त शिक्षण पुणे कार्यालयाद्वारे पुरविण्यात यावे. अशा प्रकारचे आदेश राज्याचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांनी काढले आहेत

# ऑनलाईन बदल्याची वेबसाईट बंद! संवर्ग चार च्या शिक्षकांचे हाल!

बीड-लोक इच्छा प्रतिनिधी सध्या जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या ऑनलाइन बदल्यांची प्रक्रिया सुरू आहे. या शिक्षकांच्या बदल्या होत असताना सर्वात जास्त अन्याय जर कोणावर होत असेल तर तो संवर्ग चारच्या शिक्षकांवर. ज्या शिक्षकांना कोणीही वाली नाही असे सर्व शिक्षक मायबाप सरकारने संवर्ग चारच्या यादीत ढकलले आहेत. त्यात पुन्हा बीड जिल्ह्यातील जवळपास साडेतीन हजार संवर्ग चारच्या शिक्षकांना ऑनलाइन




पद्धतीने बदलीची माहिती भरण्यासाठी सरकारने केवळ चारच दिवस दिले होते. यापूर्वी संवर्ग एक च्या व दोनच्या अशा सर्व मिळून जवळपास 1300 शिक्षकांना माहिती भरण्यासाठी प्रत्येकी चार दिवस देण्यात आले होते. निदान संवर्ग चारच्या शिक्षकांची संख्या पाहता त्यांना जास्त कालावधी देणे गरजेचे होते परंतु तसे झाले नाही. यामुळे गुरुवारी तिसऱ्या दिवशी शिक्षकांनी वेबसाईट ओपन केल्यानंतर जवळपास एक वाजल्यापासून सायंकाळी सात वाजेपर्यंत बदली प्रक्रियेची वेबसाईट ही बंद होती. यामुळे हजारो शिक्षकांना आपली बदली प्रक्रियेची माहिती ऑनलाईन पद्धतीने भरता आली नाही. अशा परिस्थितीत आता शासनाने संबंधित शिक्षकांन


## आज ह.भ.प.श्री. महंत तुकाराम महाराज भारती यांचे कीर्तन



पाटोदा (प्रतिनिधी) आदर्श गाव पिठ्ठी येथे चालत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण या सोहळ्यामध्ये ह.भ.प.श्री. महंत तुकाराम महाराज भारती यांचे आज रात्री 8:30ते १0 या वेळेमध्ये कीर्तन होणार आहे तरी पिठ्ठी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या अमृताला कीर्तनाचा व अखंड हरिनाम सप्ताहाचा अवश्य लाभ घ्या असे आवाहन पिठ्ठी गावातील ग्रामस्थांनी केली आहे,

# कष्ट अन जिद्दीच्या जोरावर भोंडवे पती-पत्नीची गगनभरारी!

## पत्रकार नितीन भोंडवे व मयुरी भोंडवे या पती-पत्नीची सोबतच महावितरण मध्ये निवड ; संघर्षमय जीवनाचा उत्तम प्रवास



### आई-वडिलांच्या डोळ्यातील आनंदअश्रू मुलगा अन् सुनेच कौतुक सांगणारे : प्रा.सचिन पवार

जेव्हा आपली मुलं आई-वडिलांच्या अपेक्षा इच्छा पूर्ण करतात तेव्हा आई-वडिलांच्या डोळ्यातील आनंद अश्रू हे आपल्या मुलांचं कौतुक करत असतात पिठ्ठी येथील पत्रकार नितीन भोंडवे व सौ.मयुरी भोंडवे यांची नुकतीच महावितरण मध्ये निवड झाली त्यांच्या परिवारात एक आनंदाचे वातावरण पाहायला मिळालं जिद्द आणि चिकाटी असेल तर सर्व गोष्टी साध्य होतात हे त्यांनी दाखवून दिले. हे यश पाहताना मुलाचे आई-वडील आणि सुनेची सासू-सासरे यांच्या डोळ्यातील आनंदाश्रू हे मुलाचं आणि सुनेचं कौतुक करणारे होते भोंडवे कुटुंबीयांनी घेतलेली गगनभरारी अशीच उंचावर जावो एवढीच अपेक्षा. तसेच पुढील वाटचालीसाठी भोंडवे कुटुंबीयांना खूप खूप शुभेच्छा...

**– प्रा.सचिन पवार**
**जिल्हाउपाध्यक्ष मराठी पत्रकार परिषद बीड.**

### मित्र हे आपल्या जीवनातील एक अनमोल नातं : गोकुळ इंगोले

मैत्री हे नातं वय नाहीतर स्वभाव बघून बनलं जातं , आदराने बोलणारा सर्वांचं मन जिंकणारा ,जिथे भेट होईल तेथे थांबून बोलणारा ,खरंच मित्रा आज अभिमान वाटतो तुम्ही दोघं महावितरण मध्ये निवड झाली मैत्रीत निष्ठा, विश्वास, आणि एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती असते. खरा मित्र योग्य मार्गदर्शन देतो, संकटात मदत करतो आणि निस्वार्थपणे साथ देतो ईश्वरचरणी हीच प्रार्थना की तुम्हाला दोघांना उदंड आयुष्य देवो हीच ईश्वरचरणी व नगद नारायण चरणी प्रार्थना...

**– पत्रकार गोकुळ इंगोले**
**तालुकाध्यक्ष : डिजिटल मीडिया परिषद पाटोदा.**



पाटोदा | प्रतिनिधी संघर्षांनी भरलेल्या वाटेवरून चालत, न थांबता स्वप्नांशी प्रामाणिक राहून, अखेर यशाच्या शिखरावर झेप घेणारा एक तरुण म्हणजे युवा पत्रकार नितिन बबन भोंडवे व त्यांच्या पत्नी सौ.मयुरी नितिन भोंडवे यांची नुकतीच महावितरणमध्ये निवड झाली आहे. ही बातमी समजताच संपूर्ण कुटुंब, गाव आणि परिसरात आनंदाश्रू आणि अभिमानाने डोळे पाणावले. नितिन यांचे बालपण खडतर परिस्थितीत गेले. वडील श्री. बबन किसन भोंडवे [शेती ],आई सौ .आशाबाई बबन भोंडवे घरसंचालन करत असताना,मोठा भाऊ सतिश भोंडवे याने हमाली करून छोट्या भावाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष दिले कधीही होऊ नाही. रात्रीच्या अंधारात विजेच्या कमी पडणाऱ्या प्रकाशात अभ्यास करणारा हा मुलगा, आज वीज वितरण विभागातच काम करणार आहे, हीच एक मोठी उपमेक आहे.त्यांची महावितरणमध्ये झालेली निवड केवळ नोकरी मिळवण्यापुरती मर्यादित नाही, तर ती त्याच्या संघर्षशीलतेची आणि ध्येयवेड्या प्रयत्नांची जिवंत साक्ष आहे. परीक्षेतील यश, मुलाखतीतील आत्मविश्वास आणि सततची चिकाटी हे त्यांच्या यशाचे खरे गमक ठरले. गावातील लोकांसाठी नितिन व मयुरी हे आता प्रेरणेचे प्रतीक झाले आहेत. शेजारी सांगतात, “हा मुलगा नेहमी शांतपणे अभ्यास करत असे. त्याच्यात काहीतरी वेगळं आहे हे जाणवत होतं. आज ते खरं ठरलं.”आईच्या डोळ्यांत आनंदाश्रू तर वडिलांच्या चेहऱ्यावर अभिमान. “त्याच्या यशामागे त्याची मेहनत आहे, आम्ही फक्त साथ दिली,” असे त्यांच्या आईवडिलांनी नम्रपणे सांगितले.एक स्वप्न खरं झालं, पण अनेक नव्या स्वप्नांना पंख मिळाले आहेत.




### वडिलांनी 20 पेक्षा जास्त वर्षे हमाली केली आई मोलमजुरी करायची, भाऊ देखील हमालीच करायचा .--राजेश निर्मळ

नितीन आणि मयुरी चे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, खोमणेवस्ती इथे होऊन माध्यमिक शिक्षण जवाहर विद्यामंदिर निरगुडी येथून पूर्ण झाले. उच्च शिक्षणासाठी शासकीय औद्योगिक महाविद्यालयात प्रवेश घेऊन ITI मध्ये पदवी घेऊन महावितरण च्या परीक्षांची तयारी सुरू केली. त्यांनी त्याची संपूर्ण तयारी अगदी बीड मध्ये राहूनच कोणत्याही क्लासेस शिवाय केली. कारण क्लासेस लावायला मिळतील अशी स्थिती नव्हती. आणि या स्पर्धेच्या जगात त्याने खूप उंच भरारी दोघाही नवरा बायकोची सोबतच निवड झाली. त्यांचा संघर्ष मी जवळून अनुभवला आहे.त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा.....!

**राजेश ईश्वर निर्मळ (पोलिस उपनिरीक्षक)**

### महावितरणमध्ये तरुण जोडप्याची निवड : गावाचा अभिमान

बीड जिल्ह्यातील पटोदा तालुक्यातील पिठ्ठी गावचे सुपुत्र युवा पत्रकार नितिन भोंडवे व त्यांच्या अर्धांगिनी सौ.मयुरी नितिन भोंडवे यांची नुकतीच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) या राज्याच्या महत्त्वाच्या वीज खात्यात यशस्वी निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे.नितीन व मयुरी हे पिठ्ठी येथील रहिवासी असून, त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोमणे वस्ती व उच्च शिक्षण जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर माध्यमिकयेथून पूर्ण केले. त्यांनी कठोर अभ्यास, चिकाटी आणि समर्पणाच्या जोरावर ही यशाची शिखरे गाठली आहेत.महावितरण ही महाराष्ट्रातील वीज वितरणाची प्रमुख संस्था असून, या संस्थेत निवड होणे ही एक अत्यंत प्रतिष्ठेची बाब मानली जाते. लाखो उमेदवारांमधून निवड होणे हे निश्चितच कौतुकास्पद आहे.गावकऱ्यांनी आणि त्यांच्या शिक्षकांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. बबन किसन भोंडवे यांनी मुलाच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, “त्याने लहानपणापासूनच मेहनतीने अभ्यास केला आणि आज तो फलदायी ठरला.”या यशामुळे गावातील तरुणांसमोर एक प्रेरणादायी आदर्श उभा राहिला असून, अनेकांना स्पर्धा परीक्षा देन्यासाठी नवी दिशा मिळाली आहे..

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com